PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Asla Navra Nako Ga Bai
Year: 1977

Song: Mala Asla Navra Nako
Lyricist:

मनासारखा निवडून घ्यावा
जोडीदार कसला हवा
असला असला की असला
अरे यार
मला असला नवरा नको यार
मला असला नवरा नको नको
असला नवरा नको यार
मला असला नवरा नको नको
मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
तुला कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
मला असला नवरा नको यार
मला असला नवरा नको नको
असला असला की असला

हा लाखाचा धनी
घरी गं जळतो अत्तर दिवा
बंगला माडी सारे असूनी
हुंडा याला हवा
हुंडा याला हवा
हुंडा नाही वरदक्षिणा
वरदक्षिणा
अरे यार
असे नाव हे हुंड्याचे
पांघरूण हे ढोंगाचे
हुंडा देऊन विकतचा नवरा
भाडोत्री असला नको नको
मग कसला नवरा हवा

यार तुला कसला नवरा हवा हवा
तुला कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
मला असला नवरा नको यार
मला असला नवरा नको नको
असला असला की असला

हा तर दिसतो पक्का गुंडा
करतो दादागिरी
इंग्लिश दारू पितो पाजतो
वरती स्मग्लिंग करी
वरती स्मग्लिंग करी
स्मग्लिंग नाही इम्पोर्ट एक्सपोर्ट
इम्पोर्ट एक्सपोर्ट
अरे यार
सभ्यपणाच्या नावाखाली
काळा पैसा करणी काळी
तो पापाचा पैसा सारा
काळा खतरा नको नको
मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
तुला कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
मला असला नवरा नको यार
म्ला असला नवरा नको नको
असला असला की असला

हा तर दिसतो खुशाल चेंडू
चिकना चिकना कसा

Literacy for a Billion

खाना पीना मज्जा मारना
आहे मवाली जसा
आहे मवाली जसा
मवाली नाही जॉली
जॉली
अरे यार
बांधून झिंज्या हिप्पीसारखा
फॅशन उसनी करी
कडकी असूनी लडकी मागे

लोचट लूब्रा नको नको
मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
तुला कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
मला असला नवरा नको यार
मला असला नवरा नको नको
असला असला की असला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*